# खवळलेल्या दर्यावर मच्छीमार झाले स्वार

**मुरूड : सुधीर नाझरे**

पावसाने उघडीप दिली असली तरी अजूनही दर्या शांत झालेला नाही. फेसाळलेल्या उंचच उंच लाटा परस्परांवर आदळत आहेत. त्यांचा होणारा आवाजही अनेकदा कानठळ्या बसणारा असतो अशा खवळलेल्या दर्यावर स्वार होण्याचे धाडस मुरूडच्या कोळी बांधवांनी दाखवत शुक्रवारी आपल्या मच्छीमार बोटी नव्या हंगामासाठी खोल समुद्रात लोटल्या आहेत. जिवाची पर्वा न करता समिंदराला साकडं घालत हे कोळी बांधव ताज्या म्हावऱ्यासाठी खोल समुद्रात मार्गस्थ झाले आहेत. आता सर्वांनाच ओढ लागली आहे ती नव्या हंगामातील मिळणाऱ्या बोंबील, पापलेटची.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर सरकारने मच्छीमारीवर १ जून ते ३१ जुलै अशी दोन महिने घातलेली बंदी उठून आता आठ, दहा दिवसांचा कालावधी लोटला आहे. पण खराब हवामानामुळे तसेच समुद्र खवळलेला असल्याने खबरदारी म्हणून मच्छीमारांनी खोल समुद्रात मासेमारीसाठी जाण्याचे टाळले होते. पण मच्छीमारीवर जीवन अवलंबून असलेल्या मच्छीमारांनी आता थेट खवळलेल्या समुद्रावरच स्वार होत आपल्या मच्छीमारी बोटी किनाऱ्यावरून खोल समुद्रात मार्गस्थ केल्या आहेत. मुरूड परिसरातील शेकडो बोटी खोल समुद्रात मार्गस्थ होताना दिसत आहेत.पंधरा दिवसांची शिदोरी बरोबर घेऊन नाखवा मंडळी आपल्या अन्य सहकाऱ्यांना सोबत घेऊन बोटी हाकताना दिसत आहेत.

## नव्या हंगामासाठी नौका झाल्या मार्गस्थ...

### ताज्या म्हावऱ्याची खवय्यांना प्रतीक्षा

येत्या १९ ऑगस्टला नारळी पौर्णिमा आहे. तोपर्यंत हे मच्छीमार एक, दोन फेऱ्या मारून ताजी मच्छी घेऊन किनाऱ्यावर येतील.

सुरुवातीच्या काळात या मच्छीमारांना ताजी, ताजी बोंबील, पापलेट यांची आवक वाढणार आहे. मादिलीचाही आताच सीझन असल्याने खवय्यांसाठी मोठी पर्वणीच ठरणार आहे.याशिवाय बांगडे,भिलजा या प्रमुख मच्छींचा लांटिही अनेकदा लागतो.या सर्वांची प्रतीक्षा आता खवय्यांना लागली आहे.

## लग्नाच्या आमिषाने तरुणीवर अत्याचार ; संशयितास कोठडी

**रत्नागिरी :** लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार करत तिच्यावर मातृत्व लादणाऱ्या संशयिताला न्यायालयाने शुक्रवारी तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे. मोहसिन अब्दुलगनी शेख (३७, रा.चर्चरोड, रत्नागिरी) असे पोलिस कोठडी सुनावण्यात आलेल्या संशयिताचे नाव आहे. त्याच्या विरोधात पीडितेने शहर पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. या तक्रारीनुसार, संशयित मोहसिन शेख याने पीडितीपासून आपले पहिले लग्न झाले असल्याचे लपवून तिला लग्नाचे आमिष दाखवले. मोहसिनने सप्टेंबर २०२१ ते जानेवारी २०२४ या कालावधीत तिच्यावर अत्याचार केला. यातून पीडितेने एका मुलीला जन्म दिल्यानंतर तिला मोहसिनचे या पूर्वीचे लग्न झाले असल्याचे समजले.

# कोकण रेल्वे दुपदरीकरण होणार

## खा. रवींद्र वायकर यांनी दिल्लीत केंद्रीय मंत्र्यांना दिले निवेदन

**चिपळूण : पुढारी वृत्तसेवा**

माजी पालकमंत्री राहिलेले खा. रवींद्र वायकर हे कोकणातील बंदर विकास आणि कोकण रेल्वेच्या दुपदरीकरणासाठी सरसावले आहेत. या बाबत त्यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री व केंद्रीय बंदर विकासमंत्र्यांना निवेदन दिले असून कोकण रेल्वेचे दुपदरीकरण लवकर पूर्ण करावे अशी मागणी केली.

कोकण रेल्वे मार्गावरून दररोज चाकरमानी प्रवास करीत असतात. मात्र हा रेल्वेमार्ग एकेरी असल्याने अनेकवेळा लोकांची रखडपट्टी होते. त्यामुळे कोकण रेल्वेचा मार्ग दुहेरी होण्याचे स्वप्न कोकणातील चाकरमानी बघत आहे. कोकण रेल्वेचा मार्ग दुहेरी करावा या मागणीचे निवेदन दिले. सध्या कोकण रेल्वे मार्ग एकेरी आहे. पनवेल ते वीर दरम्यान दुपदरीकरण झाले आहे. मात्र गणेशोत्सव, होळी, उन्हाळ्यामध्ये सुट्टीत दरवर्षी तीनशे कोटीहून अधिक प्रवासी कोकणात प्रवासी करीत असतात.फेस्टिव्हल ट्रेन सोडण्यात येतात. मात्र, एकच ट्रॅक असल्याने कोकण रेल्वेचे वेळापत्रक कोलमडते आणि अनेकवेळा प्रवासी रखडतात. यामुळे कोकण रेल्वेच्या गाडड्या वेळेत सुटत नाहीत आणि वेळेत पोहोचत नाहीत. दुपदरीकरणाचा प्रस्ताव एक वर्षापासून कोकण रेल्वे महामंडळाकडे प्रलंबित असून गांभीर्याने विचार करून तत्काळ मंजुरी देण्यात यावी, अशी मागणी खा. वायकर यांनी केली.

### मुख्यमंत्री व अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक

जिल्ह्याचे माजी पालकमंत्री राहिलेले रवींद्र वायकर यांचे कोकण व जिल्हा विकासाकडे लक्ष आहे. जिल्ह्याचा सर्वांगीण विकास व्हावा, यासाठी हे आता सरसावले आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री आणि बंदर विकासमंत्र्यांची भेट घेऊन को.रे.चे दुपदरीकरण व बंदर विकासाचा मुद्दा घेतला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय मंत्र्यांनी लवकरच कोकण रेल्वे दुपदरीकरणासाठी संबंधित राज्यांचे मुख्यमंत्री आणि अधिकारी यांच्यासमवेत संयुक्त बैठक बोलाविली जाईल, असे आश्वासन खा. वायकर यांना दिले आहे.

# रिफायनरी विरोधकांवरील गुन्हे मागे घेणार

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

रिफायनरीला विरोध केल्याप्रकरणात बारसू पंचक्रोशीतील ग्रामस्थांवर दाखल असलेले राजकीय व सामाजिक स्वरूपातील गुन्हे ३१ ऑगस्टपर्यंत मागे घेतले जाणार असून, त्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली असल्याची माहिती उद्योगमंत्री व रत्नागिरीचे पालकमंत्री उदय सामंत यांनी दिली. बारसूचा प्रकल्प हा लोकांना विश्वासात घेऊन केला जाईल असेही त्यांनी यावेळी सांगितले.

रत्नागिरी जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकार परिषदेत ते बोलत होते. जिल्हा दौऱ्यावर असलेल्या पालकमंत्री उदय सामंत यांनी जिंदल, फिनोलेक्स सह आरजीपीपीएल संदर्भात बैठका घेऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. यावेळी आरजीपीपीएलमधील कर्मचाऱ्यांचा एक मे रोजी कामगार दिनाचा पगार कापण्यात आल्याची तक्रार करण्यात आली होती. या कर्मचाऱ्यांना सुट्टीचा पगार मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले. बारसू व नाणार परिसरातील रिफायनरी विरोधकांसोबतही बैठक पार पडली. यात अशोक वालम, ग्रामस्थ, सरपंच उपस्थित होते.

# शिंदे,फडणवीस, पवार २१ला रत्नागिरीत

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे २१ ऑगस्ट रोजी रत्नागिरी जिल्हा दौऱ्यावर येत असून यावेळी 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजने सह इतर विकास कामांचा शुभारंभ करणार असल्याची माहिती पालकमंत्री उदय सामंत दिली.

लाडकी बहिण योजनेचा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थित रत्नागिरीत शुभारंभ कार्यक्रम होणार आहे. यावेळी २ लाख ७४ हजार महिलांना ८१ कोटी रुपये जमा केले जाणार आहेत. पहिल्या टप्प्यात दोन महिन्यांचे तीन हजार रुपये १७ ऑगस्टपर्यंत बँक खात्यात जमा होणार असल्याचेही त्यांनी सांगितले. २१ ऑगस्टला मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत मोठा कार्यक्रम होणार आहे. तत्पूर्वी जिल्ह्यातील पाच हजार महिलांना एकत्र आणले जाणार आहे.

# महामार्गावरील डेब्रिजवर कारवाईचे आदेश

**भिवंडी : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई-नाशिक महामार्गावरील वाहतूक कोंडीची समस्या सोडवणुकीसाठी स्वतः मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे शुक्रवारी रस्त्याच्या पाहणी करता अधिकाऱ्यांना सोबत घेऊन निघाले होते. यावेळी हायवे दिवे ग्रामपंचायतीच्या हद्दीत महामार्ग लगत मोठा डेब्रिजचा साठा रस्त्या कडेला टाकलेला आढळून आला. या कडे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे लक्ष जाताच त्यांनी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना विचारणा करीत डेब्रिज तात्काळ हटवण्यासाठी ठरणार आहे.

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या सुचने नंतर तहसीलदार अभिजित खोले यांनी तात्काळ या आदेशाची अंमलबजावणी करीत या परिसरातील नियोजन प्राधिकरण असलेल्या एम एम आर डी ए व पंचायत समिती प्रशासना कडून स्पष्टीकरण मागविले आहे. जिल्हाधिकारी कार्यालया कडून या हा डेब्रिजचा डॉंगर नक्की कोणी उभा केला हे निष्पन्न झाल्यावर त्यांच्यावर नक्की कोणती कारवाई होते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

संबंधितांवर कारवाई करण्याचे आदेश दिले.या आदेश नंतर हे प्रकरण कोणावर शेकणार हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

## तळोजात १० लाखांचा गुटखा हस्तगत

**पनवेल :** तळोजा औद्योगिक वसाहतीलगत असणाऱ्या घोट गावामध्ये पोलिसांनी घातलेल्या छाप्यात तब्बल १० लाख २७ हजार रुपयांचा गुटखा व पानमसाला जप्त केला. मोहम्मद खालीद यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे अन्वेषणेही कारवाई केली.

# आरवली येथे अपघातात सांगलीतील दोघे गंभीर

**आरवली : पुढारी वृत्तसेवा**

मुंबई - राष्ट्रीय महामार्गावर संगमेश्वर तालुक्यातील आरवली येथे दुचाकी आणि बोलेरो पिकअप या वाहनांमध्ये अपघात होऊन दोन दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले. अपघातातील दोन्ही जखमी तरुण हे सांगली जिल्हातील बत्तीस शिराळा येथील आहेत. हा अपघात सकाळी १० वाजताच्या सुमारास घडला.

या बाबत अधिक माहिती अशी कि, बत्तीस शिराळा ता. सांगली येथील राहणारे अमर विश्वास वांकडे आणि संजय साळुखे हे दोघे तरुण सावर्डे येथील आपल्या मित्रांना भेटण्यासाठी दुचाकीवरन वरून जात असताना आरवली ता. संगमेश्वर येथे स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेसमोर एका बोलेरो पिकअपवर आदळले. यामध्ये ते दोघेही गंभीर जखमी झाले.

### सार्वजनिक सूचना

**सर्वसामान्यांना कळवण्यात येतआहे की श्रीमती शीतल शिवाजी पाटील यांच्याकडे असलेला बकुल, बी/६, प्लॉट क्र. ६६, महाळा फुले को ऑ ह सो, शिवसृष्टी, कुर्ला (पूर्व), मुंबई 400 024 हा पत्यावर युनिकिट शेअर सर्टिफिकेट क्र. 23 या विशिष्ट क्रमांकाचे 106 ते 110 शेअर्स आहेत ह हरवले आहे आणि म्हणून त्यांच्याकडून सोसायटीकडे ड्पिलिकेट शेअर सर्टिफिकेट जारी करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला आहे.**

**सोसायटी याद्वारे महाळा फुले को ऑ ह सो लिमिटेडच्या सोसायटी कार्यालया द्यवाळ समर्थन देणारे संबंधित पुरावे आणि कागदपत्रांसह ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून 14 (चौदा दिवसांच्या) आत ड्पिलिकेट शेअर प्रमाणपत्र जारी करण्यासाठी दावे आणि हरकती मागवते. जर सर नमूद केलेल्या कालावधीत कोणाचे आक्षेप प्राप्त झाले नाहीत, तर सोसायटी उपविधींमध्ये विहित केलेल्या पद्धतीने ड्पिलिकेट शेअर प्रमाणपत्र श्रीमती शीतल शिवाजी पाटील यांना जारी करण्यास मुक्त असेल.**

**महाळा फुले सहकारी गृहनिर्माण संस्था ब्यवतीने.**
**सचिव**

Place: Mumbai
दि. 10-08-2024

# कोकण रेल्वे दुपदरीकरण होणार

## खा. रवींद्र वायकर यांनी दिल्लीत केंद्रीय मंत्र्यांना दिले निवेदन

**चिपळूण : पुढारी वृत्तसेवा**

माजी पालकमंत्री राहिलेले खा. रवींद्र वायकर हे कोकणातील बंदर विकास आणि कोकण रेल्वेच्या दुपदरीकरणासाठी सरसावले आहेत. या बाबत त्यांनी केंद्रीय रेल्वेमंत्री व केंद्रीय बंदर विकासमंत्र्यांना निवेदन दिले असून कोकण रेल्वेचे दुपदरीकरण लवकर पूर्ण करावे अशी मागणी केली.

कोकण रेल्वे मार्गावरून दररोज चाकरमानी प्रवास करीत असतात. मात्र हा रेल्वेमार्ग एकेरी असल्याने अनेकवेळा लोकांची रखडपट्टी होते. त्यामुळे कोकण रेल्वेचा मार्ग दुहेरी होण्याचे स्वप्न कोकणातील चाकरमानी बघत आहे. कोकण रेल्वेचा मार्ग दुहेरी करावा या मागणीचे निवेदन दिले. सध्या कोकण रेल्वे मार्ग एकेरी आहे. पनवेल ते वीर दरम्यान दुपदरीकरण झाले आहे. मात्र गणेशोत्सव, होळी, उन्हाळ्यामध्ये सुट्टीत दरवर्षी तीनशे कोटीहून अधिक प्रवासी कोकणात प्रवासी करीत असतात.फेस्टिव्हल ट्रेन सोडण्यात येतात. मात्र, एकच ट्रॅक असल्याने कोकण रेल्वेचे वेळापत्रक कोलमडते आणि अनेकवेळा प्रवासी रखडतात. यामुळे कोकण रेल्वेच्या गाडड्या वेळेत सुटत नाहीत आणि वेळेत पोहोचत नाहीत. दुपदरीकरणाचा प्रस्ताव एक वर्षापासून कोकण रेल्वे महामंडळाकडे प्रलंबित असून गांभीर्याने विचार करून तत्काळ मंजुरी देण्यात यावी, अशी मागणी खा. वायकर यांनी केली.

### सार्वजनिक सूचना

**सर्वसामान्यांना कळवण्यात येतआहे की श्रीमती शीतल शिवाजी पाटील यांच्याकडे असलेला बकुल, बी/६, प्लॉट क्र. ६६, महाळा फुले को ऑ ह सो, शिवसृष्टी, कुर्ला (पूर्व), मुंबई 400 024 हा पत्यावर युनिकिट शेअर सर्टिफिकेट क्र. 23 या विशिष्ट क्रमांकाचे 106 ते 110 शेअर्स आहेत ह हरवले आहे आणि म्हणून त्यांच्याकडून सोसायटीकडे ड्पिलिकेट शेअर सर्टिफिकेट जारी करण्यासाठी अर्ज प्राप्त झाला आहे.**

**सोसायटी याद्वारे महाळा फुले को ऑ ह सो लिमिटेडच्या सोसायटी कार्यालया द्यवाळ समर्थन देणारे संबंधित पुरावे आणि कागदपत्रांसह ही नोटीस प्रकाशित झाल्यापासून 14 (चौदा दिवसांच्या) आत ड्पिलिकेट शेअर प्रमाणपत्र जारी करण्यासाठी दावे आणि हरकती मागवते. जर सर नमूद केलेल्या कालावधीत कोणाचे आक्षेप प्राप्त झाले नाहीत, तर सोसायटी उपविधींमध्ये विहित केलेल्या पद्धतीने ड्पिलिकेट शेअर प्रमाणपत्र श्रीमती शीतल शिवाजी पाटील यांना जारी करण्यास मुक्त असेल.**

**महाळा फुले सहकारी गृहनिर्माण संस्था ब्यवतीने.**
**सचिव**

Place: Mumbai
दि. 10-08-2024

### कार्यालयाचा पत्ता-
**धर्मादाय आयुक्त कार्यालय, साल्पीश भवन, सायन्स रोड, डॉ. ॲनी बेझंट रोड, वरळी, मुंबई- ४०० ०३०.**

**सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था नोंदणी कार्यालय, बृहन्मुंबई विभाग मुंबई.**
**जाहिर नोटीस**
**(महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० च्या कलम २२-नियम ७ व ७ अे वाचावे)**
**किरकोळ अर्ज क्रमांक : Miscellaneous Application Number MISC. ACC/V/1361/2024, MISC. ACC/V/1362/2024**

**ज्याअर्थी, 'THE INDIAN ASSOCIATION OF GYNAECOLOGICAL ENDOSCOPISTS', मुंबई, नोंदणी क्र. F/5336 (BOM) या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेच्या सादरकर्ता विश्वस्त, Atul Moraji Ganatra यांनी**
**ACC/V/3701/2024, ACC/V/3702/2024,**

**यानामे बदला करता उपरोक्त बदल अहवाल सादर केलेला आहे व तो सहायक धर्मादाय आयुक्त-५ यांनी दिनांक ०६.०८.२०२४ रोजी तात्पुरता स्वीकृत केलेला आहे. त्याअर्थी, हितसंबंध असलेल्या सर्व संबंधित लोकांना सदर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, सदर बदल अहवालास आपणास काही आक्षेप/हरकत घ्यावयाची असल्यास, आपण आपली हरकत सदर जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १० दिवसाचे आत सहायक धर्मादाय आयुक्त-५ यांचेसमोर दाखल करावी, अन्यथा, सदर अहवालास आपली काहिही हरकत नाही, असे समजून सदर बदल अहवालावरती सदर नोटीस प्रसिध्द झालयापासून ३० दिवसा नंतर अंतिम आदेश करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

**आज दिनांक ०६.०८.२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व सहायक धर्मादाय आयुक्त (५) यांच्या शिक्क्यापानिशी दिली.**

शिक्का

**सही/-**
**अधिक्षक (न्याय),**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,**
**बृहन्मुंबई विभाग मुंबई यांचेकरिता.**

### पुष्पांजली को -ऑप क्रेडिट सोसायटी लि.

(नोंदणी क्रमांक : बी.ओ.एम./(डब्ल्यू.सी.)/आर.एल.आर./सी.आर./३७१/सन ८८-८९)
मुख्य कार्यालय : रुम,तुली पुष्पांजली, भुतेश्वर, मुंबई - ४०० ००२.
फोन नं. २४४२४६५६
प्रशासकीय कार्यालय :-४०१, अर्थ विंटेज, सेनापती बापट मार्ग ,दादर ,मुंबई ४०० ०२८

**३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा**
**(फक्त सभासदांसाठी )**
**++ सभेची सूचना ++**

सर्व सन्मानमीय सभासदांना कळविण्यात येते कि, पुष्पांजली को -ऑप.क्रेडिट सोसायटी लिमिटेड या संस्थेची ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. विठ्ठल नारायणशेठ भोईटे यांच्या अध्यक्षतेखाली रविवार, दिनांक २५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता आर्य समाज हॉल, प्लॉट नं.०६, सेक्टर-९ए , वाशी, नवी मुंबई - ४०० ७०३ येथे खालील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आलेली आहे. सर्वी आपण सभेस वेळेवर उपस्थित रहावे , ही विनंती.

**++ सभेपुढील विषय ++**

१) मागील वि. २६/०८/२०२३ रोजी झालेल्या परिसरावाचा वार्षिक सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दिनांक ०८/०१/२०२४ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेच्या कामकाजाचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
३) संचालक मंडळाने सादर केलेल्या वि.३१ मार्च २०२४ अखेरचा वार्षिक अहवाल, ताळेबंदपत्रक व नफा-तोटा पत्रक यास मंजूरी देणे.
४) संचालक मंडळाने दिनांक ९८/०७/२०२४ रोजीच्या सभेत सन २०२३ -२०२४ च्या नफा विभागणीबाबत घेतलेल्या निर्णयास मंजूरी देणे.
५) सन २०२३- २०२४ या आर्थिक वर्षाचे अंतर्गत व वैधानिक लेखापरिक्षक यांच्या लेखापरिक्षण अहवालावर विचार विनिमय करून तो दिपावून करणे.
६) सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालास अनुसरून तयार करण्यात आलेला दोष दुरुस्ती अहवाल दिपावून करणे
७) सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाकरिता अंतर्गत आणि वैधानिक हिशोबतपासणिसांची नेमणूक करणे व त्यांचे तेवाप्रीत्यर्थ मानधनाचा अन्दाज देणे.
८) मागील वर्षी अंदाजपत्रकपेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे, तसेच सन २०२४ - २०२५ या वर्षाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
९) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५(२) नुसार संचालक मंडळ व त्यांच्या नातेवाईकांस दिलेल्या कर्जाची माहिती देणे.
१०) संचालक मंडळ यांनी सुचविलेल्या उपविधीमधील घोटाळ्या दुरुस्तीस, तसेच मा. सहकार आयुक्त यांची भाग भांडवल मर्यादा वाढीस बाबत मंजूर मोठ्ठी ठरावानची मर्यादा उपविधीमध्ये दुरुस्ती करण्यास मान्यता मिळणेबाबत.
११) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलयाचा सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१२) मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

स्थळ : मुंबई
दिनांक: ०४/०८/२०२४

मा.संचालक मंडळाच्या आदेशानुसार
(सौ.शिला शेखर चिंदे)
सचिव/व्यवस्थापक

**++ सूचना/टीप ++**

१) गणसंख्येअभावी सदर सभा तहकूब झाल्यास वरील सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेनंतर अध्यर्य तासाने घेण्यात येईल व यास गणसंख्येचे बंधन असणार नाही.
२) ज्या सभासदांना, सभेच्या विषयाचुषंगाने काही माहिती हवी असेल किंवा सुचना, प्रश्न सभेपुढे मांडावयाचे असतील तर त्यांनी ते लेखी स्वरुपात दिनांक १७/०८/२०२४ पर्यंत संस्थेच्या कामकाजाच्या वेळेत प्रशासकीय कार्यालयात पोहोचतील अशा रितीने पाठवावेत.,आत्याच्या वेळी आलेल्या सुचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.
३) सहण्याच्या किंवा व्यवहारात्याच्या पत्यात बदल झाला असेल तर तो संस्थेस लेखी कळवावा. ज्या सभासदांनी यारात्री मांड केली असेल किंवा ज्यांना यारसार बदलून घ्यायचे असतील त्यांनी बदल करून घ्यावेत. ज्या सभासदांना ऑडिट रिपोर्ट व दोष दुरुस्ती अहवाल पाहावयाचा असेल त्यांनी संस्थेच्या मुख्य कार्यालयाची व विभाग समी लेखी व्यवस्थापन संपर्क साधावा.
४) ज्या सभासदांना फक्त सभेची नोटीस मिळाली असेल, त्यांना सभासदाची अहवाल प्रत वेळ्यात येईल.

### भाग्योदय सहकारी पतपेढी मर्यादित, मुंबई
### एक्कावनव्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची एक्कावनवी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार दि. २५/ ०८/ २०२४ रोजी सकाळी ठिक १०.०० वाजता "विरोडकर हायस्कूल सभागृह"**, तळमजला, नेरुळकर मैदानच्या मागे, परेल, मुंबई-१२. येथे संस्थेचे **अध्यक्ष श्री. रामचंद्र वाकोवा चव्हाण** यांच्या अध्यक्षतेखाली खालील नमुद केलेल्या कामकाजाचा विचार करण्यासाठी बोलविण्यात आली आहे. तरी सर्व सभासदांनी सभेला वेळेवर उपस्थित रहावे ही विनंती.

**सभेपुढील कामकाज**

१. दिनांक १०/०९/२०२३ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून मंजूर करणे
२. संस्थेच्या संचालक मंडळाने सन २०२३-२०२४ सालात संस्थेच्या कामकाजाबाबत सादर केलेल्या अहवालास व वैधानिक लेखापरिक्षण झालेले ताळेबंद पत्रक व नफा-तोटा पत्रकास मंजूरी देणे.
३. संचालक मंडळाने कायदा व नियम यास अनुसरुन शिफारस केल्याप्रमाणे सन २०२३-२०२४ अहवाल सालातील नफा विभागणीस मंजूरी देणे.
४. सन २०२३-२०२४ या सहकारी वर्षाचा वैधानिक लेखापरिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक व टॅक्स लेखापरिक्षक यांच्याकडून आलेल्या अहवालास मंजूरी देणे.
५. सन २०२४-२०२५ या सालाकरिता निबंधकांनी जाहिर केलेल्या नॉनलायबीलिटी पात्र वैधानिक लेखापरिक्षक, अंतर्गत लेखापरिक्षक व टॅक्स लेखापरिक्षक नेमणूक करणे व मेहनताना ठरवणे.
६. सन २०२२-२०२५ या वर्षाकरीता संचालक मंडळाने तयार केलेल्या अंदाजपत्रकाची आणि गतवर्षाच्या अंदाजपत्रकातील खर्चाची माहिती देणे आणि मान्यता देणे.
७. संचालक व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाबाबत माहिती देणे.
८. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचा मेहनताना ठरविणे.
९. वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांची अनुपस्थितीस मंजूरी देणे.
१०. मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या अन्य विषयांवर विचार करणे.

दिनांक : ३१/ ०७/ २०२४
स्थळ : मुंबई

आपला सहकारी
श्री. लक्ष्मण परसु पाटील
सचिव

**सुचना**

१. गणसंख्येअभावी सभा तहकुब झाल्यास त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने सभा भरविण्यात येईल. त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.
२. सभेस येतेवेळी सोबत पासबुक घेऊन येणे. बिगर सभासदास प्रवेश दिला जाणार नाही.
३. वार्षिक अहवाल संस्थेमध्ये कार्यालयीन वेळेत येऊन घेऊन जावे.

### PUBLIC NOTICE

Notice is hereby given that I, on behalf of my client, am investigating the title of Mr. Satish Kantilal Mody (hereinafter referred to as the **'Owner'**), with respect to Flat no. 1301, 13th floor, A Wing, Mahalakshmi Tower, New D. N. Nagar Co-operative Housing Society Ltd., D. N. Nagar, Andheri (West), Mumbai- 400 053, admeasuring approximately 640 sq. ft. carpet area alongwith right to One Car Parking Space bearing no. 1301/A wing at basement of Mahalakshmi Tower along with the Shares as described in the Schedule hereinbelow.

My client is intending to purchase all the rights, title and interest of the Owner in respect of the Flat and the Shares described in the Schedule hereinbelow.

If any person or persons is/are having any claim(s), any Interest in the said Flat and the said Shares as described in the Schedule hereunder written, by way of sale, charge, exchange, gift, lease, sub-lease, lien, tenancy, sub-tenancy, mortgage, inheritance, leave and license, easement, heirship or under any agreement or otherwise whatsoever, should notify the same in writing to me at my office address at Premises No. 18, 1st Floor, 'E' Building, Khiranagar, S. V. Road, Santacruz (West), Mumbai- 400054, with documentary proof of such claim(s) or interest, if any, within 15 (fifteen) days from the date of publication of this public notice, failing which it shall be presumed that the Owner is absolutely entitled to the said Flat and Shares as described in the Schedule hereinbelow and that the said Flat and the said Shares are free from all encumbrances and charges whatsoever and the matter of investigation of title and transaction in respect thereof shall be completed by my client without having any reference to such claim(s), if any, and the same shall be considered as waived.

**THE SCHEDULE REFERRED TO ABOVE:**

**Description of Flat**

Flat no. 1301, 13th floor, A wing, Mahalakshmi Tower, New D. N. Nagar Co-operative Housing Society Ltd., D. N. Nagar, Andheri (West), Mumbai- 400 053, admeasuring approximately 640 sq. ft. carpet area alongwith right to One Car Parking Space bearing No. 1301/A in the basement of Mahalakshmi.

**Description of the Shares**

10(Ten) fully paid-up shares of Rs. 50/- each bearing distinctive numbers 451 to 460 (both inclusive) under Share Certificate No. 046 issued by the New D. N. Nagar Co-operative Housing Society Ltd. in respect of the aforesaid Flat.

**Dated this 10th day of August, 2024**

SD/-
**MS. PAYOJA A. GANDHI**
**ADVOCATE, BOMBAY HIGH COURT**

### प्राइम फोकस लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : प्राइम फोकस हाऊस, सिनेजिंग रोड, सिटी कॅम्पस्मोर, खार (पश्चिम), मुंबई-४०००५२.
दूरध्वनी : ०२२-२६४८९००० वेबसाइट : www.primefocus.com
फॉर्टिस आयडेंटिटी नंबर (सीआयएन) : L92100MH1997PLC108981

**दि. ३०.०६.२०२४ रोजी संपलेल्या तिमाहीकरिताच्या अलेखापरिक्षित एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा तारांश**
(रु. लाखांत)

| अ. क्र. | तपशील | तिमाहीअखेर | | | वर्षअखेर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ३०.०६.२०२४ | ३१.०३.२०२४ | ३०.०६.२०२३ | ३१.०३.२०२४ | |
| | | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित | |
| १. | परिचालनातून एकूण उत्पन्न (निव्वळ) | ८१४४.०१ | ८७६९.७७ | १४१०.८८ | १५०५३.४४ | |
| २. | कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (कर, अपवादात्मक बाबपूर्व) | (१३६४.८६) | (१९७९.५१) | (६८८.४८) | (५८७०.३१) | |
| ३. | करपूर्व कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबोत्तर) | (१३६४.८६) | (१९७९.५१) | (६८८.४८) | (५८७०.३१) | |
| ४. | कालावधीकरिता निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबोत्तर) | (१५८०.६४) | (८७४.१३) | (४२९.३२) | (४८८९.०४) | |
| ५. | कालावधीकरिता एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (तोटा) | (१७५४.३८) | (१६१२.८८) | (११८८.१३) | (१४९६२.५) | |
| ६. | समभाग भांडवल | २१२८.७१ | २१२८.७१ | २१२५.३७ | २१२८.७१ | |
| ७. | राखीव (पुनर्मूल्यांकन राखीव वगळता)नुसार सर्वसाधारण ताळेबंदपत्रकाने दर्शविल्याप्रमाणे | | | | ४८६०१.६८ | |
| ८. | प्रत्येक प्रतिभूतीस (अपवादात्मक बाबींपूर्वी) (रिन्यल्ड कर) (प्रत्येकी रु. १/-) (अवार्षिकीकृत) | | | | | |
| | अ) मूलभूत | | | | | (१६.३१) |
| | ब) सौम्यीकृत | | | | | (१६.३१) |
| ९. | प्रत्येक प्रतिभूतीस (अपवादात्मक बाबींपश्चात) (प्रत्येकी रु. १/-) (अवार्षिकीकृत) | | | | | |
| | अ) मूलभूत | (५.२७) | (१.६८) | (१.४१) | (१६.३१) | |
| | ब) सौम्यीकृत | (५.२७) | (१.६८) | (१.४१) | (१६.३१) | |

**स्वतंत्र वित्तीय निष्कर्षांची महत्त्वाची आकडेवारी**
(रु. लाखांत)

| अ. क्र. | तपशील | तिमाहीअखेर | | | वर्षअखेर | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | ३०.०६.२०२४ | ३१.०३.२०२४ | ३०.०६.२०२३ | ३१.०३.२०२४ | |
| | | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | अलेखापरिक्षित | लेखापरिक्षित | |
| १. | उलाढाल (निव्वळ विक्री) | १०७९.७७ | ११९८.३५ | ७४८.३७ | ३३९८.७५ | |
| २. | करपूर्व नफा/(तोटा) | २१४१०.५१ | ४०.५२ | (५५.४४) | (५०.८०) | |
| ३. | करपश्चात नफा/(तोटा) | २२१०२.३० | (८६.१६) | (१७.७६) | (३८.१५) | |

१. वरील तपशील हे सेबी (सूचीबद्धता आवश्यकता) विनियम, २०१५ च्या विनियम ३३ अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसकडे सादर करण्यात आलेल्या त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलाचा विस्तृत प्रार